दै. पुढारी दि. 01/11/2022

# अट्टल घरफोड्या 'वॉन्टेड' संज्या नामणूर जेरबंद

## भाग्यनगर पोलिसांची कामगिरी

**नांदेड, पुढारी वृत्तसेवा :** एका रात्रीत ४ ते ५ घरफोड्या यशस्वी करण्याचा हातखंडा असणारा अट्टल घरफोड्या संज्या नामणूर याच्या भाग्यनगर पोलिसांनी रविवारी पहाटे मुसक्या आवळल्या. संज्यावर सुमारे ४० घरफोड्या केल्याचा गुन्हा नोंद आहे. त्याचे साथीदार जाकेर आणि डिंक्या हे दोघेजण मात्र पळून जाण्यात यशस्वी झाले. मागील अनेक दिवसांपासून संज्या हा पोलिसांना 'वॉन्टेड' होता.



मागील काही दिवसात गुन्हेगारीचा आलेख लक्षणीय वाढला आहे. जिल्हाभरात घरफोडी, जबरी चोऱ्या, मोबाईल लंपास करणे, महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्रे हिसकावणे आणि ऑटो प्रवासादरम्यान प्रवाश्यांना लुटण्याचे गंभीर प्रकार सुरु आहेत. आयुष्यभराची 'जमापूंजी' चोरटे चोरून नेत असल्याने 'कॉमन मॅन' पुरता वैतागला आहे.

या दरम्यान भाग्यनगर पोलिसांची दमदार कामगिरी पुढे आली आहे. रविवारी पहाटे मंत्रीनगर येथील एका घरात चोरी करत असताना काही नागरिकांनी चोरट्यांना पाहिले. त्यांनी तातडीने भाग्यनगर पोलिसांशी संपर्क साधला. 'डिटेक्शन ब्रँच'चे अधिकारी, कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीस येईपर्यंत नागरिकांनी चोरट्यांवर पाळत ठेवली होती. पोलीस येताच त्यांनी एका चोरट्यास अटक केली. मात्र त्याचे दोन साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाले. अटक केलेला चोरटा हा अट्टल घरफोड्या संजय उर्फ समीर उर्फ संज्या पंडितराव नामणूर असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले.

संज्या नामणूर हा मूळचा कळमनुरी तालुक्यातील गुंडलवाडी येथील रहिवासी असून त्याने कळमनुरी येथे एक भव्य बंगला बांधला आहे. त्याचा साथीदार जाकेर याच्या बहिणीसोबत त्याचे लग्न झाले असून तो दोन मुलांसह येथे राहतो. सध्या त्याची पत्नी मुलांसह महेबूबनगर येथे माहेरी राहण्यास आली आहे. संज्याने तब्बल ४० घरफोड्या केल्या आहेत. नांदेड, हिंगोली, परभणी आणि यवतमाळ येथील विविध पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्ह्यांची नोंद आहे. एकाच रात्री ४-५ घरफोड्या संज्या करत असे. पोलिसांनी 'सुंदरी' दाखविताच त्याने अनेक ठिकाणी चोरी केल्याची पोलिसांकडे कबुली दिली.

पोलिस आता चोरीचा माल जप्त करण्याच्या कामात आहेत. पोलिस निरीक्षक सुधाकर आडे यांच्या नेतृत्वाखाली 'डिटेक्शन ब्रँच'ने ही कामगिरी केली असून संज्याच्या अटकेने अनेक मोठ्या घरफोड्यांची उकल होण्याची शक्यता आहे.